(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[(१९५२) एस. सी. आर ४१८]

डब्ल्यू. एच. किंग

- विरुद्ध -

भारताचे गणराज्य आणि इतर

[ सर न्यायाधीश पतंजली शास्त्री, न्यायमूर्ति मेहरचंद महाजन, न्यायमूर्ति मुखर्जी, न्यायमूर्ति दास आणि न्यायमूर्ति चंद्रसेखर अय्यर]

*बॉम्बे भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवास गृह दर नियंत्रण अधिनियम ( १९४७ चे LVII ), कलम १९ -'पगडी' मिळाल्यानंतर भाडेकरुद्वारे तिसऱ्या व्यक्तीला* कब्जा देणे - *हे हक्क सोडणे आहे काय ? - अभिहस्तांकन आणि हक्क सोडणे यातील फरक-दण्ड संविधिचा अर्थ लावणे.*

बॉम्बे भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवास गृह दर नियंत्रण अधिनियम , १९४७ च्या कलम १९ च्या उपकलम (१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "भाडेकरू किंवा भाडेकरूच्या वतीने कार्य करणाऱ्या किंवा कार्य करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही परिसराची भाडेदारी सोडण्याची अट म्हणून कोणत्याही रकमेचा किंवा कोणत्याही मोबदल्याचा दावा करणे किंवा प्राप्त करणे कायदेशीर ठरणार नाही"; आणि उपकलम (२) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "जो कोणी भाडेकरू किंवा व्यक्ती उपकलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही रक्कम किंवा मोबदला प्राप्त करतो, त्याला दोषसिद्धीनंतर कारावास आणि द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

ए, जो एका फ्लॅटचा भाडेकरू होता, त्याने 'पगडी' मिळाल्यावर एका दस्तऐवजानुसार फ्लॅटचा रिकामा कब्जा 'बी' कडे सोपवला, ज्यात असे म्हटले होते की ए चा फ्लॅटवर कोणताही दावा नसेल आणि बी थेट घरमालकाला भाडे देईल. ए ला कलम १९(२) अंतर्गत

गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले. असे मानले गेले की, कलम १९ (१) च्या अर्थानुसार ए ने त्याच्या भाडेदारीचे त्याग केले नव्हते आणि दोषसिद्धी कायम ठेवली जाऊ शकत नाही.

एकीकडे भाडेदारीचे अभिहस्तांकन आणि दुसरीकडे हक्क सोडणे किंवा स्वाधीन करणे यात स्पष्ट फरक आहे. अभिहस्तांकानाच्या बाबतीत, अभिहस्तांकनकर्ता हा भाडेदारी अंतर्गत त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी घरमालकास जबाबदार राहतो. सदर दायित्व संविदाविषयक आहे आणि असे असताना अभिहस्तांकिती मालमत्तेच्या उत्तरदानातील परस्पर हितसंबंधाच्या कारणास्तव उत्तरदायी होतो. संविदा किंवा त्याउलट स्थानिक परिपाठाच्या अनुपस्थितीत, एखाद्या अभिहस्तांकनासाठी घरमालकाची संमती आवश्यक नसते. पण हक्क सोडण्याच्या बाबतीत तो एकतर्फी व्यवहार असू शकत नाही; तो केवळ त्यांच्यातील परस्पर कराराद्वारे पट्टेकाराच्या बाजूने असू शकतो. कब्जा सोडून देण्याची कृती ही पट्टेकाराच्या किंवा जी व्यक्ती पट्टेकाराचा हितसंबंध धारण करते अशा व्यक्तीच्या बाजूने असायला पाहिजे; आणि कब्जा एखाद्याच्या स्वाधीन केल्यास किंवा सोडून दिल्यास, पट्टेदाराच्या त्यावरील हक्क संपुष्टात येऊन तो पट्ट्याने पट्टेकाराकडे दिला जातो.

हे १९४७ च्या बॉम्बे अधिनियम क्रमांक LVII च्या कलम १९ अन्वये गुन्हा आहे आणि द्रव्यदंड आणि कारावासाची शिक्षा लादण्यात येते, म्हणून कलमातील शब्दांचा त्या विषयाच्या बाजूने काटेकोरपणे अर्थ लावला गेला पाहिजे. संविधिमध्ये वापरलेल्या भाषेत आणि प्रत्यक्षात जे बोलले गेले आहे त्याचा शक्यतो काय हेतू असू शकतो याची न्यायालयाला फारशी काळजी नाही.

बॉम्बे उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय फिरविण्यात आला.

फौजदारी अपिलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक ८/१९५१.

दिनांक ९ जानेवारी १९५० रोजी इलाखा शहर दंडाधिकारी, १९ वे न्यायालय, एस्प्लेनेड, मुंबई यांनी प्रकरण क्रमांक १०८७९/पी/१९४९ मध्ये दिलेल्या आदेशाविरुद्ध दिनांक २० फेब्रुवारी १९५० रोजी बॉम्बे उच्च न्यायालयाने (न्यायमूर्ति श्री. बावडेकर आणि न्यायमूर्ति श्री. चैनानी) फौजदारी अपील क्रमांक १०६/१९५० मध्ये दिलेल्या आदेशावरून उद्भवलेले अपील. न्यायनिर्णयात वस्तुस्थिती नमूद करण्यात आली आहे.

अपीलकर्त्यासाठी श्री. ईश्वरलाल सी. दलाल आणि श्री. आर. बी. दलाल.

भारताचे गणराज्य (उत्तरवादी क्र. १) साठी भारताचे महान्यायअभिकर्ता श्री. सी. के. दफ्तरी (यांचे सह श्री. जी. एन. जोशी)

उत्तरवादी क्र.२ साठी श्री. जिंद्र लाल

दिनांक : १ फेब्रुवारी १९५२

**न्यायमूर्ति श्री. चंद्रसेखर अय्यर यांनी दिलेले न्यायनिर्णय** :- ज्या वस्तुस्थितीमधून सदर फौजदारी अपील उद्भवले आहे ते प्रदीर्घ नाही. अपीलकर्ता, डब्ल्यू. एच. किंग, जो मुंबईत 'असोसिएटेड कमर्शियल एंटरप्रायझेस' च्या नावाखाली आणि शैलीत व्यवसाय करत आहे, तो मरीन ड्राइव्ह बॉम्बे येथील "गंगा विहार" नावाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटचा भाडेकरू होता, जो दुर्गेश्वरी देवी नावाच्या महिलेचा आहे. भाड़ेदारी मासिक होती आणि भाडे रु. २१५/- होते. असे म्हटले जाते की अपीलकर्त्याला त्याच्या दृष्टीदोषाच्या उपचारासाठी युनायटेड किंगडमला जायचे होते आणि त्याच्या इच्छित निर्गमनाच्या दृष्टीने त्याच्या कब्जात असलेल्या फ्लॅटबद्दल आवश्यक व्यवस्था करण्याच्या हेतूने त्याने एका सय्यद नावाच्या व्यक्तीमार्फत फिर्यादी मूलचंद कोडुमल भाटियाशी संपर्क साधला, जो सदर अपिलामध्ये दुसरा उत्तरवादी आहे. अभियोग पक्षाचे म्हणणे आहे की, आरोपीने फिर्यादीला फ्लॅटचा रिकामा कब्जा देण्यासाठी मोबदला म्हणून ३०,०००/- रुपयांची मागणी केली, जे नंतर कमी होऊन रु. २९,५००/-करण्यात आली आणि फर्निचरसाठी अतिरिक्त रक्कम रु. २०००/- ची मागणी केली आणि फिर्यादीने सदर रक्कम देण्याचे मान्य केले. फिर्यादीने प्रत्यक्षात आरोपीला दिनांक ७ नोव्हेंबर १९४८ आणि १७ नोव्हेंबर १९४८ रोजी प्रत्येकी ५०० रुपये अश्या दोन रकमा दिल्या. तथापि, त्याने दिनांक १/१२/१९४८ रोजी पोलिसांशी संपर्क साधला आणि नंतरच्याचे सोबत, अपीलकर्त्यासाठी सापळा रचला गेला. अशी व्यवस्था करण्यात आली की, १०००/- रुपये फर्निचरसाठी देण्याचे शिल्लक असल्याने फिर्यादीने त्याच्या सोबत १०००/- रुपये आणावेत आणि पोलीस त्याला अपीलकर्त्यास देण्यासाठी

रु. २९,५००/- देतील. फिर्यादी आणि एक उप-निरीक्षक, फिर्यादीचा भाऊ असल्याचे भासवत, दिनांक ०४/१२/१९४८ रोजी अपीलकर्त्याकडे गेले आणि त्याला दोन रकमा दिल्या; आणि फ्लॅटच्या आणि मोटर गॅरेजच्या चाव्याफिर्यादीच्या ताब्यात देण्यात आल्या. अपीलकर्ता आणि त्याची पत्नी फ्लॅटमधून बाहेर पडत असताना, फिर्यादीचा भाऊ म्हणून वेषभूषा केलेल्या व्यक्तीने आपला वेश फेकून दिला आणि आपली ओळख जाहीर केली. खाली सदर सापळ्यासाठी तयार असलेल्या पोलीस पथकाने अपीलकर्त्याची गाडी ताब्यात घेतली आणि गाडीच्या मागच्या सीटवरून ३०,५००/- रुपयांची रक्कम जप्त केली आणि काही कागदपत्रे, फिर्यादी आणि अपीलकर्ता यांच्यातील भागीदारी कराराचा टाइप केलेला मसुदा आणि काळजीवाहू म्हणून इमारतीचा ताबा घेण्यासाठी परवानगी अर्ज, तक्रारदाराकडून चाव्यांचा गुच्छा आणि अपीलकर्त्याने त्याच्या स्वाधीन केलेली कागदपत्रे जप्त करण्यात आली म्हणजे, रिकामा ताबा देण्याचे पत्र (निशाणी डी ), फर्निचरच्या वस्तूंसाठी रु.२००० ची पावती (निशाणी ई), तक्रारदाराच्या नावावर गॅस कनेक्शन हस्तांतरित करण्यासाठी बॉम्बे गॅस कंपनीला पत्र (निशाणी एफ) आणि दूरध्वनी कनेक्शन हस्तांतरित करण्यासाठी बॉम्बे विद्युत पुरवठा आणि वाहतूक समितीला पत्र आणि रुपये २७/- ची ठेव (निशाणी जी).

अपीलकर्त्यावर १९४७ च्या बॉम्बे भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवास गृह दर नियंत्रण अधिनियम क्रमांक LVII च्या कलम १८(१) अन्वये २९,५००/- रुपयांची *पगडी* स्वीकारल्याबद्दल दोषारोप ठेवण्यात आला होता आणि पुढे सदर अधिनियमाच्या कलम १९(२) अन्वये त्याच्यावर भाडेदारीच्या त्यागासाठी अट म्हणून उक्त रक्कम प्राप्त केल्याबद्दल दोषारोप ठेवण्यात आला. सदर खटल्यात दुसरी आरोपी असलेल्या त्याच्या पत्नीवर दोन गुन्ह्यांमध्ये आपल्या पतीला मदत आणि अपप्रेरणा दिल्याचा दोषारोप ठेवण्यात आला होता.

अपीलकर्त्याचा बचाव असा होता की तो त्याच्या इच्छित अनुपस्थितीत त्याचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी एका भागीदाराच्या शोधात होता, जो त्याच्या फ्लॅटचा काळजीवाहू म्हणूनही काम करणार होता आणि याच संदर्भात आणि या उद्देशाने त्याने फिर्यादीशी वाटाघाटी केल्या. रक्कम रुपये २९,५००/- ही 'पगडी' रक्कम नसून परंतु व्यवसायातील ०-१२-० शेअरसाठी भांडवल दर्शवित होते आणि फिर्यादी हा फ्लॅटचा काळजीवाहू देखील असल्याने, रक्कम रु. २,०००/- फर्निचरची विल्हेवाट आणि नुकसान

विरुद्ध हमी म्हणून दिले गेले आणि प्राप्त  झाले आणि अपीलकर्ता भारतात परतल्यावर ते परत देण्याचे मान्य  करण्यात आले.  अपीलकर्त्याच्या पत्नीने कोणतीही मदत केल्याचे आणि अपप्रेरणा दिल्याचे नाकारले.

सदर खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या  इलाखा शहर दंडाधिकारीने असे मत व्यक्त करून की, आरोपीने जी रक्कम प्राप्त केली, ती पगडीद्वारे होती, वस्तुस्थितीवरील बचावावर अविश्वास ठेवला. अधिनियमाचे कलम १८(१) लागू नसल्यामुळे त्याने त्याला अधिनियमाच्या कलम १९(२) अंतर्गत दोषी ठरवले आणि त्याचे वृद्धत्व आणि अंधत्व लक्षात घेऊन त्याला एका दिवसाच्या साध्या कारावासाची  आणि रु. ३०,०००/- च्या द्रव्य दंडाची शिक्षा दिली. पुरावे कोणत्याही प्रकारची अपप्रेरणा सिद्ध करण्यास अपुरे असल्यामुळे त्याच्या पत्नीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

अपीलकर्त्याने बॉम्बे उच्च न्यायालयात अपील दाखल केली परंतु ती दिनांक २०/०२/१९५० रोजी थोडक्यात फेटाळण्यात आली. त्यांनी राज्यघटनेच्या अनुच्छेद १३४ (१) (सी) अंतर्गत प्रमाणपत्र मागितले, परंतु ते दिनांक १०/०४/१९५० रोजी फेटाळण्यात आले. त्यानंतर त्यांनी या न्यायालयात अपील करण्यासाठी विशेष अनुमती अपील दाखल केली जी दिनांक ०३/१०/१९५० रोजी मंजूर करण्यात आली.

अधिनियमाच्या कलम १९(१) च्या परिभाषेच्या आधारे अपीलकर्त्याच्या वतीने एक छोटासा कायदेशीर युक्तिवाद मांडण्यात आला होता आणि हा एकमेव मुद्दा आहे जे आमच्या विचारार्थ घेण्यासाठी आवश्यक आहे. दोन भागांचा समावेश असलेल्या सदर कलमात पुढीलप्रमाणे अटी आहेत :-

"(१) भाडेकरू किंवा भाडेकरूच्या वतीने कार्य करणाऱ्या किंवा कार्य करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही परिसराची भाडेदारी सोडण्याची अट म्हणून कोणत्याही रकमेचा किंवा कोणत्याही मोबदल्याचा दावा करणे किंवा प्राप्त करणे कायदेशीर ठरणार नाही";

(२) जो कोणी भाडेकरू किंवा व्यक्ती उपकलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही रक्कम किंवा मोबदला प्राप्त करतो, त्याला दोषसिद्धीनंतर ६ महिन्यांपर्यंतच्या

कारावासाची  शिक्षा दिली जाईल  आणि  त्याला मिळालेल्या मोबदल्याच्या रकमेपेक्षा किंवा मूल्यापेक्षा कमी नसणाऱ्या द्रव्यदंडाची शिक्षा देखील दिली जाईल.

अशी विनंती करण्यात आली की , भाडेकरूने त्याच्या भाडेदारीचा त्याग करण्याची अट म्हणून कोणतीही रक्कम किंवा कोणताही मोबदला मिळाल्यावरच हा गुन्हा उद्भवतो आणि प्रस्तुत प्रकरणात असा कोणताही त्याग झालेला नाही. निशाणी डी, जो सर्वात महत्वाचा दस्तऐवज आहे, ज्या अंतर्गत अपीलकर्त्याने फ्लॅटचा रिकामा कब्जा फिर्यादीच्या सुपूर्द केला आहे, तो  भाडेदारीचा अभिहस्तांकन घडवितो किंवा पुरावा देतो आणि  त्यागाबद्दल नाही. त्यात म्हटले आहेः-

"मी, डब्ल्यू. एच. किंग, याद्वारे दुसऱ्या मजल्यावरील माझा फ्लॅट क्रमांक ३ आणि मरीन ड्राइव्ह रोडवरील प्लॉट क्रमांक ५५ वरील गंगा विहार इमारतीच्या तळमजल्यावरील गॅरेज क्रमांक ४ चा रिक्त ताबा श्री. मूलचंद कोडुमल भाटिया यांच्याकडे आजपासून सुपूर्द करतो आणि या फ्लॅटवर माझा कोणताही दावा नाही आणि श्री. मूलचंद कोडुमल भाटिया थेट घरमालकाला भाडे देतील".

अपीलकर्त्याच्या वतीने केलेला युक्तिवाद आम्हाला योग्य वाटतो आणि तो स्वीकारला पाहिजे. विद्वान महा न्यायअभिकर्त्याने  आग्रह केला की  "त्याग" हा शब्द कलेचा शब्द नाही आणि सदर कलमामध्ये  कोणत्याही कठोर तांत्रिक अर्थाने नव्हे तर परिसराचा ताबा सोडणे या त्याच्या सर्वसमावेशक अर्थाने वापरला गेला होता; आणि त्यांनी निदर्शनास आणून दिले की जर विधानमंडळाचा असा हेतू होता की 'त्याग' चा 'अपीलकर्त्याच्या वतीने त्यावर ठेवण्याचा प्रयत्न केला' असा मर्यादित अर्थ असावा, तर मालमत्ता हस्तांतरण कायद्यात वापरलेला 'स्वाधीन करणे' हा शब्द अधिक योग्य ठरला असता.  या संदर्भात अधिनियमाच्या कलम १५ आणि १८ चा संदर्भ देण्यात आला होता परंतु आमच्या मते ते विद्वान अधिवक्त्याच्या युक्तिवादाला कोणतीही मदत देत नाहीत. भाडेकरूने त्याच्या  हिताच्या इतर कोणत्याही पद्धतीने पोट भाडेपट्ट्याने देणे, अभिहस्तांकन किंवा हस्तांतरण करणे हे कलम १५ अंतर्गत बेकायदेशीर केले आहे. कलम १८ कोणतेही परिसर भाडेपट्ट्याने देणे, नूतनीकरण किंवा सातत्य किंवा पोट भाडेपट्टयाद्वारे किंवा अन्यथा भाडेपट्टीच्या हस्तांतरणासाठी

घरमालकाद्वारे त्याची संमती देण्याशी संबंधित आहे आणि त्यात अशी तरतूद आहे की जमिनीचा मालक, ज्याला कोणताही दंड, हप्ते किंवा रक्कम किंवा ठेवी यासारखी इतर रक्कम किंवा अनुदान, नूतनीकरण किंवा सातत्य किंवा संमतीचा करार यासाठीचा कोणताही मोबदला प्राप्त होतो, तो गुन्ह्यासाठी दोषी असेल आणि त्यात निर्दिष्ट केलेल्या शिक्षेस पात्र असेल. त्यामुळे असे दिसून येते की, भाडेकरूद्वारे भाडेपट्ट्याचे अभिहस्तांकन किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करणे हा गुन्हा मानला जात नाही ; संविधित केवळ असे सांगण्यात आले आहे की, तो कायदेशीर व्यवहार नाही. भाडेपट्ट्याच्या हस्तांतरणासाठी पोट भाडेपट्टयाद्वारे किंवा अन्यथा मोबदला मिळाल्यावर जमिनीच्या मालकाची संमती हा गुन्हा ठरवण्यात आला आहे. त्यानंतर कलम १९ येते जे भाडेकरूद्वारे कोणत्याही परिसराचे भाडेदरीपण सोडून देण्याबद्दल सांगते. जर अभिव्यक्तीद्वारे 'अभिहस्तांकन' जे प्रस्तुत प्रकरणात आमच्यासमोर आहे, ते अभिप्रेत होते तर योग्य शब्दांचा वापर केला जाऊ शकला असता, जसे की भाडेकरूद्वारे त्याच्या हिताचे हस्तांतरण, जे आम्हाला मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम १०८, उपखंड (जे) मध्ये आढळते.

एकीकडे भाडेदारीचे अभिहस्तांकन आणि दुसरीकडे हक्क सोडणे किंवा स्वाधीन करणे यात स्पष्ट फरक आहे. अभिहस्तांकानाच्या बाबतीत, अभिहस्तांकनकर्ता हा भाडेदारी अंतर्गत त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी घरमालकास जबाबदार राहतो. सदर दायित्व संविदाविषयक आहे आणि असे असताना अभिहस्तांकिती मालमत्तेच्या उत्तरदानातील परस्पर हितसंबंधाच्या कारणास्तव उत्तरदायी होतो. संविदा किंवा त्याउलट स्थानिक परिपाठाच्या अनुपस्थितीत, एखाद्या अभिहस्तांकनासाठी घरमालकाची संमती आवश्यक नसते. पण हक्क सोडण्याच्या बाबतीत तो एकतर्फी व्यवहार असू शकत नाही; तो केवळ त्यांच्यातील परस्पर कराराद्वारे पट्टेकाराच्या बाजूने असू शकतो. कब्जा सोडून देण्याची कृती ही पट्टेकाराच्या किंवा जी व्यक्ती पट्टेकाराचा हितसंबंध धारण करते अशा व्यक्तीच्या बाजूने असायला पाहिजे; आणि कब्जा एखाद्याच्या स्वाधीन केल्यास किंवा सोडून दिल्यास, पट्टेदाराच्या त्यावरील हक्क संपुष्टात येऊन तो पट्ट्याने पट्टेकाराकडे दिला जातो. मालमत्ता हस्तांतरण कायद्यात 'त्याग' हा शब्द आढळत नाही यात काही शंका नाही, परंतु विविध प्रांतांमधील अनेक भाडेकरार कायद्यांमध्ये असे आढळते की, भाडेकरूद्वारे घरमालकाला

लेखी नोटीस देऊन भाडेकरूच्या बाजूने त्याचा हक्क सोडण्याशी संबंधित काही कलमे आहेत. पुढे नमूद केले पाहिजे की, आक्षेपित कलम, सर्वसाधारणपणे त्याग किंवा ताबा सोडण्याबद्दल बोलत नाही. हे शब्द 'कोणत्याही जागेवरील त्याच्या भाडेदारीचे त्याग" असे आहेत. भाड़ेदारीचे त्याग हे पट्टेदाराने किंवा भाडेकरूने त्याचे हक्क स्वाधीन केल्याएवढेच आहे. भाड़ेदारीचा परित्याग करणे हा त्याग करण्याच्या अर्थामध्ये येईल की नाही हा प्रश्न या अपीलमध्ये उद्भवत नाही, कारण निशाणी 'डी' च्या पार्श्वभूमीवर, भाडेकरू काहीही न बोलता आणि भाडेपट्टाखाली त्याच्या हित आणि आणि मालकीबद्दल कोणतीही व्यवस्था न करता घटनास्थळावरून पूर्णपणे गायब झाला या अर्थाने कोणताही परित्याग नाही.

अधिनियमाखाली गुन्हा होत असल्याने आणि द्रव्यदंड आणि कारावासाची शिक्षा लादल्यामुळेकलमातील शब्दांचा त्या विषयाच्या बाजूने काटेकोरपणे अर्थ लावला गेला पाहिजे. संविधिमध्ये वापरलेल्या भाषेत आणि प्रत्यक्षात जे बोलले गेले आहे त्याचा शक्यतो काय हेतू असू शकतो याची आम्हाला जास्त काळजी नाही.

आमच्या मते, कलम १९ आणि उप-कलम (१) च्या अर्थांतर्गत कोणताही 'त्याग' झालेला नाही, उप-कलम(२) अंतर्गत दोषसिद्धी कायम ठेवली जाऊ शकत नाही. ती रद्द केली जाते आणि रु. ३०,०००/- चे द्रव्यदंड जर आधीच दिले गेले असेल तर परत केले जातील. फिर्यादीने अपीलकर्त्यास दिलेले रु. १०००/- आणि पोलिसांनी आणलेले रु. २९,५००/- ची विल्हेवाट लावण्याबद्दल विद्वान इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाचे इतर भाग मात्र कायम राहतील.

*दोषसिद्धी रद्द केली.*

अपीलकर्त्याचे प्रतिनिधी : श्री. पी. के. चॅटर्जी

उत्तरवादी क्रमांक १ चे प्रतिनिधी : श्री. पी. ए. मेहता

उत्तरवादी क्रमांक २ चे प्रतिनिधी : श्री. गणपत राय

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X